# शांतिदूत

Bharatiya Jain Sanghatana

## कॉलेज वार्तापत्र

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
बकोरी फाटा, वाघोली, पुणे - ४१२ २०७

**वर्ष २०१५-१६, अंक १, १५ ऑगस्ट २०१५**

**संपादक : प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे**



भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष
**मा.श्री.शांतिलालजी मुथ्था**

**सामाजिक क्रांतीचे प्रणेते आणि भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय शांतिलालजी मुथ्था यांना**

**६१ व्या वाढदिवसानिमित्त**

**मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा!**

## शारीरिक शिक्षण संचालकांनी खेळाडू घडविण्या बरोबरच अध्यापन करावे. डॉ. दिपक माने



पुणे जिल्हा क्रीडा मंडळाच्या प्रथम सभेच्या उद्‌घाटनप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दिपक माने, बीजेएस कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे व इतर प्राध्यापक

वाघोली : शारीरिक शिक्षण संचालकांनी खेळाडूंच्या विविध खेळातील गुणकौशल्याचा विकास करण्यासाठी आधुनिक क्रीडा साहित्याचा वापर करावा, नवीन खेळांची ओळख खेळाडूंना करून द्यावी. क्रीडा प्राध्यापकांनी केवळ खेळाडूंना मैदानावरचे धडे न देता, खेळ, आरोग्य, व्यायाम, योगासने याविषयीचे अध्यापन देखील करावे असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दिपक माने यांनी बीजेएस कॉलेज मध्ये आयोजित केलेल्या पुणे जिल्हा क्रीडा मंडळाच्या प्रथम सभेत व्यक्त केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित असलेले इंद्रायणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बाळसराफ यांनी विद्यार्थ्यांच्या खेळाविषयीच्या भावना अधिक सजग, जागृत केल्या पाहिजेत व प्राध्यापकांनी अधिक संवेदनशील होऊन खेळाडू घडविले पाहिजेत असे मत व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रमेश गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सहदेव चव्हाण यांनी केले तर आभार डॉ. भूषण फडतरे यांनी मानले.

## बीजेएस कॉलेजमधील १८ विद्यार्थ्यांची एनसीसी मध्ये निवड




एनसीसी मध्ये निवड झालेले सर्व कॅडेट

वाघोली : भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील १८ विद्यार्थ्यांची एनसीसी साठी निवड झाली. या विद्यार्थ्यांची ARMY OPEN UNIT (3 MAH ARMD, SQN. N.C.C ),NAVY OPEN UNIT (3MAH NAVAL UNIT N.C.C) AIRFORCE OPEN UNIT (3MAH AIR SQN NCC) या युनिटमध्ये निवड झाली.स्वप्निल पवार, दरेकर संकेत, राऊत विकास, चौधरी अक्षदा, शिंदे अविष्कार, जवणे ऋषिकेश, धुरंधरे विशाल, गुलगौंडा निलेश, हरपळे सुनिल, वाबळे सुरज, बानल संतोष, शिंदे अतिश, सोनवणे अक्षय या विद्यार्थ्यांची 3 MAH ARMD मध्ये निवड झाली. धामणे किशोर, वाळके सूरज, इंगळे विशाल, साबळे जगदीश या विद्यार्थ्यांची 3 MAH AIRFORCE मध्ये निवड झाली. इंगळे शेखर याची 3MAH NAVAL UNIT मध्ये निवड झाली.

सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन शालेय समितीचे अध्यक्ष शांतिलालजी बोरा, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अभयजी मुनोत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, सर्व शाखाप्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.



१९३१-२०१५

भारतातील मिसाईल निर्मितीचे जनक, विख्यात अणुशास्त्रज्ञ,डीआरडीओचे संचालक आणि भारताला महासत्तेचे स्वप्न दाखविणारे माजी राष्ट्रपती **डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम** यांना आदरपूर्वक भावपूर्ण

**श्रद्धांजली...**

## यशासाठी गुरुंच्या मार्गदर्शनाची गरज आहे.

**प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे**



विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्राचार्य डॉ.बाबासाहेब सांगळे

वाघोली- जीवनामध्ये प्रगती करत असताना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागत असते. या प्रयत्नांना योग्य दिशा देण्यासाठी गुरुंच्या मार्गदर्शनाची नितांत गरज असते. भारतीय संस्कृतीत आई वडिलांसमान गुरुंचे स्थान असते. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच महाविद्यालयातील सर्व उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन आपल्यातील कलाकौशल्यांचा विकास करावा. चांगल्या गोष्टींचा आग्रह करून आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करावा असे मत प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी अभिभाषणात व्यक्त केले. भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये गुरूपौर्णिमेचे औचित्य साधून मा. प्राचार्यांचे अभिभाषण प्रथम वर्षातील कला, विज्ञान, वाणिज्य आणि बी.सी.ए. शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी कला शाखाप्रमुख डॉ. सिद्धेश्वर गायकवाड, वाणिज्य शाखाप्रमुख प्रा. बळवंत लांडगे, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. संजय गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाबरोबरच इतर कला, कौशल्य संपादन करण्यावर भर दिला पाहिजे, असा सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनिषा बोरा यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ. जगदीश आवटे यांनी व्यक्त केले.

## बीजेएस कॉलेजमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन !

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये घेतलेल्या परीक्षेत भारतीय जैन संघटनेच्या कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. खालील विद्यार्थ्यांनी तृतीय वर्षात प्रथम क्रमांक मिळविले.

१. भंडारे वनिता रामदास - तृतीय वर्ष कला
२.आव्हाळे कोमल नंदकुमार - तृतीय वर्ष वाणिज्य
३.शेळके ऐश्वर्या अश्रुबा - तृतीय वर्ष विज्ञान
४. बिरदवडे काजल राजेंद्र - तृतीय वर्ष बीसीए

तर खालील विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर वर्षात प्रथम क्रमांक मिळविला.

१. मुथ्था कोमल गुलाबचंद - एम. कॉम II
२. विक्रम पवार - एम. एस्सी II

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा. अभयजी मुनोत, शालेय समितीचे अध्यक्ष मा. शांतिलालजी बोरा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, सर्व शाखा प्रमुख, सर्व विभागप्रमुख, सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

संपादक – प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे * कार्यकारी संपादक – प्रा. डॉ. सहदेव चव्हाण * सदस्य – प्रा. शोभा कोकाटे, डॉ.मोनिका जैन

विनामूल्य वाटप करण्यासाठी शांतिदूत हे भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे वार्तापत्र संपादक प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी प्रकाशित करून कार्यकारी संपादक प्रा. सहदेव चव्हाण यांनी प्रसिद्ध केले. अंक सजावट व मुद्रण : श्री राज प्रिंटर्स मुद्रणालय, पुणे.

शांतिदूत संपादक मंडळ

## अनाथ विद्यार्थ्यांशी साधला होता संवाद



विद्यार्थ्यांशी संवाद साधताना
माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

वाघोली : माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या निधनाची बातमी कळताच वाघोलीतील भारतीय जैन संघटनेच्या शैक्षणिक संकुलातील शिक्षक आणि माजी विद्यार्थ्यांच्या आठवणी पुन्हा एकदा ताज्या झाल्या. कलाम यांनी भूकंपग्रस्त, कुपोषित आणि अनाथ मुलांशी साधलेला ' ग्राऊड टू अर्थ' संपर्क शिक्षकांसमोर उभा ठाकला. लातूरमधील भूकंपग्रस्त , मेळघाटामधील कुपोषित आणि अनाथ विद्यार्थ्यांचा सांभाळ आणि शैक्षणिक जबाबदारी भारतीय जैन संघटनेच्या वतीने पूर्ण करण्यात येत असल्याची माहिती कलाम यांना समजताच त्यांनी या विद्यार्थ्यांना भेटून त्यांच्याशी संपर्क साधण्याचे ठरविले. राष्ट्रपती झाल्यानंतर पुण्यातील प्रथम सार्वजनिक कार्यक्रम ३० नोव्हेंबर २००२ रोजी दुपारी ३ च्या सुमारास ठरला. महाविद्यालयाच्या प्रांगणात असणाऱ्या कडेकोट बंदोबस्तातून कलाम प्रांगणात प्रतिक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या गराड्यात सामील झाले. संवाद साधताना विद्यार्थ्यांचे ध्येय, अडचणी कलामांनी जाणून घेतल्या. या वेळी विद्यार्थ्यांनीही त्यांना प्रश्न विचारले. सव्वा तास कलाम यांनी विद्यार्थ्यांसाठी दिला होता. या वेळी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, राज्यपाल मोहम्मद फजल, शांतिलाल मुथ्था त्यांच्याबरोबर होते.

## बीजेएस महाविद्यालयास अमेरिकन अभ्यासकांची भेट



अमेरिकन अभ्यासकांबरोबर कॉलेजचे प्राचार्य
डॉ. बाबासाहेब सांगळे, माध्य.व उच्च. माध्य. विद्यालयाचे
प्राचार्य संतोष भंडारी आणि सोबत शालेय विद्यार्थी

वाघोली : धार्मिक आणि जातीय विध्वंस थांबवून मानवतेच्या कल्याणासाठी शांतता प्रस्थापित होण्यासाठी युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका येथून आलेल्या अभ्यासकांनी भारतीय जैन संघटनेचे शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प वाघोली येथे भेट दिली. शांतता, सद्भावना, सद्वर्तन व मूल्यशिक्षण यांचा संदेश देण्यासाठी आलेल्या परदेशी अभ्यासकांनी प्रकल्पातील मुलांचे, मुलींचे वसतिगृह, भोजनगृह, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाबरोबरच वरिष्ठ महाविद्यालयास भेट दिली. अभ्यासकांचे स्वागत शालेय समितीचे अध्यक्ष मा. शांतिलालजी बोरा, वसतिगृहाचे प्रशासन अधिकारी श्री. सुरेश साळुंखे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रा. संतोष भंडारी, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांनी केले. या अभ्यास दौऱ्यात पेट्रा मॅडिक, कॅटी ग्रीजडॉर्न, एलिझाबेथ मरेक, कॅथरिन संटजॉर्ज, फॅनी मथाडो, सिल्विया कर्चनेर, किल्सी रॉड्रीग्ज, सबरीना अलानो, नतानीया क्रेमर यांचा समावेश होता.

## पदवीचे शिक्षण घेताना स्पर्धा परीक्षा तयारी शक्य

प्रा. महावीर श्रीश्रीमाळ




विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची माहिती सांगताना
राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. महावीर श्रीश्रीमाळ

वाघोली : बी.ए., बी.कॉम्., बी.एस्सी. अशा पारंपरिक पदवीचे शिक्षण घेताना स्पर्धा परीक्षेची तयारी करणे सहज शक्य आहे. याकरिता स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम लक्षात घेऊन अभ्यासाचे नियोजन करणे गरजेचे आहे. नियोजनबद्ध अभ्यास, प्रामाणिकपणे कष्ट, सातत्य, वेळोवेळी शंका निरसन, स्वयंप्रेरणा, स्वयंशिस्त आणि गट अभ्यास यामधून स्पर्धा परीक्षेत सहज यश मिळविता येईल असे मत प्रा. महावीर श्रीश्रीमाळ यांनी व्यक्त केले. ते महाविद्यालयातील स्पर्धा संकल्प समितीच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा हे उपस्थित होते.

प्रा. श्रीश्रीमाळ पुढे म्हणाले की, स्पर्धा परीक्षेतून पद, प्रतिष्ठा आणि चांगले करिअर घडू शकते. त्याचबरोबर समाजात सकारात्मक हस्तक्षेप करून सामाजिक बांधिलकी जपता येईल. सभोवतालची परिस्थिती बदलण्यासाठी स्पर्धा परीक्षा हा एक उत्तम पर्याय आहे. या परीक्षेत मागील काही वर्षांत मराठी आणि विशेषत: ग्रामीण टक्का वाढत आहे. कारण ग्रामीण मराठी युवकांमध्ये असलेली कष्ट करण्याची तयारी होय. या परीक्षेतील वंचित घटकांचे प्रमाण वाढण्यासाठी युजीसीकडून विशेष अभ्यासक्रम पुरस्कृत करण्यात आला. तो महाविद्यालयात चालविला जात असून त्याचा लाभ दुर्बल घटकांनी घ्यावा. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा संकल्प समितीचे प्रमुख प्रा. दिपक अंजळ यांनी केले. त्यांनी स्पर्धा संकल्प अंतर्गत महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची तपशिलवार माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्योतिराम मोरे यांनी केले. याप्रसंगी प्रा. पद्माकर घुले, प्रा. ज्योती आखाडे यांच्यासह कला, विज्ञान व वाणिज्य या शाखेतील ३०० विद्यार्थी उपस्थित होते.

## मयुर भुजबळ यांची विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड



नवनियुक्त विद्यापीठ प्रतिनिधी मयुर भुजबळ यांच्या सोबत
प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा,
पोलीस पीएसआय चांदीलकर साहेब,
पोलीस नाईक, गाडेकर साहेब व सर्व प्राध्यापकवृंद, विद्यार्थीवृंद

वाघोली - भारतीय जैन संघटनेच्या कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात दि. १० ऑगस्ट २०१५ रोजी सर्व वर्ग प्रतिनिधी यांनी मयुर भुजबळ यांची विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड केली. महाविद्यालयामध्ये विद्यार्थी संसदेची सभा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांच्या अध्यक्षतेखाली १७ वर्गप्रतिनिधींच्या सभेचे बीजेएस सभागृहात आयोजन केले होते.

सर्व वर्गप्रतिनिधी मधून कुमारी नाथ किरण आणि मयुर भुजबळ यांनी विद्यापीठ प्रतिनिधीसाठी उमेदवारी जाहीर केली. गुप्त मतदान पद्धतीने मतदान झाले. त्यामध्ये मयुर भुजबळ याला १४ मते पडली तर नाथ किरण हिला ३ मते पडली. त्यामुळे मयुर भुजबळ यांचा विजय झाला असे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी घोषित केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. दिनेश गायकवाड, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रमेश गायकवाड, कला शाखा प्रमुख डॉ. एस. व्ही. गायकवाड, डॉ. जगदीश आवटे, वाणिज्य शाखाप्रमुख प्रा. बळवंत लांडगे, डॉ. ज्योतिराम मोरे, डॉ. सहदेव चव्हाण उपस्थित होते.

## बीजेएस कॉलेजमध्ये ' योग दिन 'साजरा



योगदिनानिमित्त योगासनाचे प्रात्यक्षिक करताना
मा. प्रसन्नकुमार बोस, प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे,
उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, व सर्व प्राध्यापकवृंद

वाघोली : भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात २१ जून हा दिवस योग दिन म्हणून मा. प्रसन्नकुमार बोस, कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. केंद्र व राज्यशासनाने काढलेल्या परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात योग दिन साजरा करण्यात आला. त्याबरोबरच बीजेएस कॉलेजमध्ये देखील योग दिनाचे औचित्य साधून मा. प्रसन्नकुमार बोस यांनी योग दिनाचे महत्व सांगून योगासनाची प्रात्यक्षिके करून दाखविली. महाविद्यालयातील कला शाखाप्रमुख डॉ. एस. व्ही. गायकवाड, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. संजय गायकवाड, वाणिज्य शाखाप्रमुख प्रा. बळवंत लांडगे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रमेश गायकवाड यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी वृंद यांनी योग दिनात सहभाग घेतला. यावेळी मा. प्रसन्नकुमार बोस यांनी योगाचे महत्त्व सांगून सर्वांना प्रात्यक्षिकातून योगासनाचे ज्ञान दिले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश गायकवाड यांनी केले. तर आभार डॉ. किशोर देसर्डा यांनी मानले.

## विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रूजला पाहिजे

डॉ. अशोक भोईटे



विज्ञान मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे
माजी कुलगुरू डॉ. अशोक भोईटे, बीजेएस कॉलेजचे
प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे रसायनशास्त्र विभागप्रमुख
डॉ. एस डी. गायकवाड,डॉ. रूपाली गुलालकरी, प्रा.माधुरी
देशमुख , डॉ .डी एन. पाटील व इतर प्राध्यापकवृंद

वाघोली : विद्यार्थ्यांच्या अंगामध्ये जे सुप्त गुण आहेत त्याचे प्रकटीकरण करणे म्हणजे शिक्षण होय. आई वडिलांकडून अनेक गुण विद्यार्थ्यांच्या अंगामध्ये उपजतपणे येत असतात. ते गुण ओळखून शिक्षकांनी त्या प्रमाणे विद्यार्थ्यांना चौफेर ज्ञान दिले पाहिजे. विद्यार्थी हा राजहंस आहे. त्याने आपल्या आजुबाजूला असलेल्या चांगल्या, वाईट गोष्टींमधून चांगल्या गोष्टी निवडाव्यात असे मत माजी कुलगुरू डॉ. अशोक भोईटे यांनी बीजेएस कॉलेज मधील विज्ञान मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

पुढे बोलताना ते म्हणाले, जीवनाचे पान सुंदर बनविण्यासाठी पुस्तकाचे पान वाचले पाहिजे. जगातील चांगल्या गोष्टी शोधल्या पाहिजेत. त्या जतन केल्या पाहिजेत. अवघड आहे ते सोपे करा. सोपे आहे ते सहज करा. सहज आहे ते सुंदर करा, सर्व विद्यार्थ्यांनी सुंदर गोष्टींचे जतन केले पाहिजे त्यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारला पाहिजे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाबरोबरच सभोवतालच्या वातावरणातील अनेक चांगल्या गोष्टींचा उपयोग जीवन सुखदायक करण्यासाठी केला पाहिजे असा संदेश दिला. कार्यक्रमाचे संयोजन रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय गायकवाड, डॉ. रूपाली गुलालकरी, डॉ. देविदास पाटील, प्रा. मनिषा बोरा, डॉ. शोभना इनामदार यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. माधुरी देशमुख यांनी मानले.